# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पुर्वीचे पुणे विद्यापीठ)

## छायांकितप्रत/स्कॅनकॉपी व पुनर्मूल्यांकन विभाग

परिपत्रक क्र. ३८ /२०१६–१७

विद्यापीठ अधिकार मंडळाने, ऑक्टोंबर,२०१६ च्या परीक्षेपासून फक्त अभियांत्रिकी विद्याशाखेसाठी व सन २०१७ च्या प्रथम सत्रातील सर्व परीक्षांसाठी प्रायोगिक तत्वावर उत्तरपत्रिकेच्या छायांकितप्रती ऐवजी स्कॅनप्रत संबंधित विद्यार्थ्याला व महाविद्यालयाला ई–मेल द्वारे पाठविण्याबाबत व सदर विद्यार्थ्याला आवश्यकता भासल्यास महाविद्यालयाने त्या स्कॅन कॉपीची प्रिन्ट देण्याबाबत निर्णय घेतलेला आहे.

संबंधित परीक्षांच्या निकालानंतर विद्यार्थ्यांनी उत्तरपत्रिकेच्या फोटोकॉपीसाठी/ स्कॅनकॉपीसाठी पुर्वीप्रमाणेच १० दिवसाच्या आतमध्ये ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावयाचा असून त्याची प्रत महाविद्यालयाकडे जमा करावयाची आहे. महाविद्यालयाने पुर्वीप्रमाणेच पुढील ०५ दिवसामध्ये प्राप्त झालेले अर्ज विद्यापीठाकडे सादर करावयाचे आहेत.

उत्तरपत्रिकेची स्कॅनप्रत महाविद्यालयाला व संबंधित विद्यार्थ्याला ई–मेल द्वारे पाठविण्यात येणार आहे. सदर उत्तरपत्रिकेची विद्यार्थ्याला प्रिन्ट हवी असल्यास महाविद्यालयाने ती विनामुल्य काढून दयावयाची आहेत. त्यासाठी येणाऱ्या खर्चापोटी प्रश्नपत्रिकेच्या छपाईसाठी प्रती पान जो दर आकारण्यात येतो त्याच दराने विद्यापीठाकडे रितसर पध्दतीने खर्चाची मागणी करावयाची आहे.

विद्यार्थ्याला स्कॅन कॉपी प्राप्त झाल्यानंतर त्वरीत पुढील ४८ तासामध्ये पुर्वीप्रमाणेच ऑनलाईन पध्दतीने पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज सादर करावयाचा आहे. व त्याची प्रत महाविद्यालयाकडे जमा करावयाची आहे. महाविद्यालयाने पुढील ४८ तासाच्या आत सदर ऑनलाईन अर्ज इनवर्ड करावयाचा आहे.

या परिपत्रकामार्फत सर्व संबंधित महाविद्यालयाना कळविण्यात येते की, सदर बाब संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनात आणून दयावी व परिपत्रकाप्रमाणे विहीत कालमर्यादेत कार्यवाही करावी.

परीक्षा नियंत्रक

गणेशखिंड,पुणे–४११००७
जा.क्रं. परीक्षा/पानि/पु.मू./२७
दिं. १६/०२/२०१७

N B + Website